# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १२७-२२ दिनांक :- ०४/०५/२०२२

## अल्पवयीन मुली व महिला संदर्भातील गैरकृत्य करणाऱ्या सवयीच्या गुन्हेगारास गुन्हे शाखा युनिट-१, काशिमिरा यांनी केले जेरबंद.

दिनांक १८/०४/२०२२ रोजी एका अल्पवयीन (०९ वर्षे) मुलीसोबत केलेल्या गैरकृत्याबाबत नयानगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २५७/२०२२ भा.द.वि. कलम ३७६ सह पोक्सो कलम ८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. अल्पवयीन मुलीसोबत सदरचा गुन्हा घडल्याने स्थानिक लोकांमध्ये असंतोष व भितीचे वातावरण निर्माण झाले होते. आरोपीताकडून अशाप्रकारचे गुन्हयाची पुनरावृत्ती होउ नये व जनमाणसांत सुरक्षिततेची भावना कायम राहवी हे अत्यंत महत्वाचे असल्याने आरोपीतास लवकरात लवकर अटक करणे आवश्यक होते.

त्याप्रमाणे वरिष्ठांच्या आदेश व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट-१, काशिमिराचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयातील घटनास्थळी भेट देउन येणारे-जाणारे मार्गाची पाहणी करुन माहिती घेतली असता आरोपीत हा घटनास्थळी येतांना नालासोपारा येथून ट्रेनने मिरारोड येथे आल्याचे समजले. तसेच घटनेनंतर सदर आरोपीत हा मिरारोड येथून मुंबई येथे गेल्याचे समजले. प्राप्त माहितीच्या आधारे तांत्रिक विश्लेषण करुन आरोपीत नामे कल्पेश गोपीनाथ देवधरे, वय - ३० वर्षे, व्यवसाय - ड्रायव्हर, रा. कांदिवली (प), मुंबई यास नालासोपारा येथून ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे.

आरोपीताकडे केलेल्या तपासामध्ये त्याचे वय १६/१७ वर्षे असताना व्हिडीओ पार्लरमध्ये लागणाऱ्या अश्लिल सिनेमा पाहून अल्पवयीन मुली व महिला बघितल्यास त्याचे मनामध्ये विकृत भावना निर्माण होउन अशा प्रकारचे गुन्हे करण्याची सवय लागली अशी माहिती मिळाली आहे. नमुद आरोपीता संदर्भात माहिती घेता त्याचे विरुध्द खालील नमुद प्रमाणे विविध पोलीस ठाण्यांत गुन्हे नोंद असल्याची माहिती मिळाली आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १ | कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई | सन २०११ भा.द.वि. कलम ५०९ |
| २ | दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई | सन २०१२ भा.द.वि. कलम ३६५, ५०९, ५०६ |
| ३ | पंतनगर पोलीस ठाणे, मुंबई | ९०/२०१२ भा.द.वि. कलम ३५४, ३६३ |
| ४ | गोरेगाव पोलीस ठाणे, मुंबई | ५९/२०१३ भा.द.वि. कलम ५०९ |
| ५ | चुनाभट्टी पोलीस ठाणे, मुंबई | २१४/२०१४ भा.द.वि. कलम ३५४ (अ) |

| | | |
|---|---|---|
| ६ | पार्कसाईट पोलीस ठाणे, मुंबई | ९८/२०१५ भा.द.वि. कलम ३८४ |
| ७ | कस्तुरबा पोलीस ठाणे, मुंबई | २२९/२०१५ भा.द.वि. कलम |
| ८ | बांगुरनगर पोलीस ठाणे, मुंबई | सन २०१६ भा.द.वि. कलम ३५४(अ)(आय), ५०९ |
| ९ | पवई पोलीस ठाणे, मुंबई | सन २०१६ भा.द.वि. कलम ३५४ |
| १० | माणिकपुर पोलीस ठाणे, वसई, ठाणे | २४९/२०१७ भा.द.वि. कलम ३५४, १८२ |
| ११ | पार्कसाईट पोलीस ठाणे, मुंबई | ८०/२०१७ भा.द.वि. कलम ५०९ |
| १२ | गोवंडी पोलीस ठाणे, मुंबई | १३८/२०१७ भा.द.वि. कलम ३५४ (अ) |
| १३ | डी.एन. नगर पोलीस ठाणे, मुंबई | २१३/२०१८ भा.द.वि. कलम ३६३,५०६,५११ |
| १४ | सायन पोलीस ठाणे, मुंबई | १९२/२०१८ पोक्सो कलम १२ |
| १५ | विलेपार्ले पोलीस ठाणे, मुंबई | ४४३/२०२० भा.द.वि. कलम ५०९ |
| १६ | दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई | ८८३/२०२० भा.द.वि. कलम ३५४ |
| १७ | दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई | ९०२/२०२० भा.द.वि. कलम ३५४(ड), ३६३ |
| १८ | कुरार पोलीस ठाणे, मुंबई | ........... भा.द.वि. कलम ३५४ |

तसेच नमुद आरोपीत याने दादर सेंट्रल पोलीस ठाणे गु.र.क्र. ८४९/२०२१ भा.द.वि. कलम ३५४ अन्वये गुन्हा केल्याची माहीती मिळाली असून सदर गुन्हयात तो पाहीजे आरोपी असल्याचे समजले आहे.

सदरची कामगिरी डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट - १, काशिमिरा गुन्हे शाखेचे पो.नि. अविराज कुराडे, स.पो.नि. कैलाश टोकले, स.पो.नि. पुष्पराज सुर्वे, पो.उप.नि. हितेंद्र विचारे, स.पो.उप.नि. राजेंद्र वेदपाठक, स.पो.उप.नि. राजु तांबे, किशोर वाडीले, अर्जुन जाधव, संदिप शिंदे, पो.हवा. संजय शिंदे, अविनाश गर्जे, मुस्तकीन पठाण, पुर्षेद्र थापा, संतोष लांडगे, सचिन सावंत, पो.शि. प्रशांत विसपुते, विकास राजपुत व सुमित जाधव यांनी केली आहे.

---ooo---